Peer Reviewed Referred and UGC
Listed Journal (Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II
IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

44
2019

330

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | १९व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक वारसा : ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल** | १-६ |
| २ | महाराष्ट्रातील शिक्षण आणि आधुनिकीकरण<br>**दुरगुडे एस. पी.** | ७-८ |
| ३ | १९व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षणाचे आधुनिकीकरण<br>**डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव** | ९-१२ |
| ४ | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील दलित पत्रकारिता<br>**डॉ. सुरज लक्ष्मण सोनवणे** | १३-१९ |
| ५ | १९व्या शतकातील इंग्रजांचे महाराष्ट्रातील शिक्षण विषयक धोरण<br>**प्रा. झरेकर रमेश सोनू** | २०-२५ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलितांचे कार्ये - एक दृष्टीक्षेप<br>**गडाख शैला सुदाम** | २६-२९ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्व दलित चळवळीची पार्श्वभूमी : एक अभ्यास<br>**डॉ. भावना श्रीपती पौळ** | ३०-३७ |
| ८ | अहमदनगर परिसरात न्यायसिंधु नियमकालिकामधुन आर्थिक राष्ट्रवादीदृष्टीने मांडलेले विचार - एक ऐतिहासिक अभ्यास<br>**प्रा. डॉ. जाधव बबन भिवसेन** | ३८-४८ |
| ९ | स्त्री समस्याविषयक सुधारणावाद<br>**प्रा. डॉ. मनिषा माणिकराव जगदाळे (कुरूमकर)** | ४९-५२ |
| १० | दक्षिणेतील ब्राह्मणवादाचा प्रसार<br>**डॉ. संजय तुळशिराम शेलार** | ५३-५९ |
| ११ | १९व्या शतकातील महाराष्ट्रातील गिरणी कामगारांची चळवळ - एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे** | ६०-६४ |
| १२ | जगन्नाथ शंकर शेठ यांचे सामाजिक शैक्षणिक कार्य<br>**बारहाते योगिता अशोक** | ६५-६७ |
| १३ | महाराष्ट्रातील कामगार चळवळ : एक अकलन<br>**डॉ. भूषण गोविंद फडतरे** | ६८-७२ |





Smt. Sindhutai Jadhav Maha. Mehkar 330

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. १९व्या शतकातील महाराष्ट्रातील गिरणी कामगारांची चळवळ - एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. पी. आर. जुनघरे**
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर ता. मेहकर जि. बुलडाणा.

**प्रास्ताविक**

१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील कामगार चळवळीचे जनक म्हणून नारायण मेघाजी लोखडे याना ओळखले जाते. नारायण लोखंडे म.ज्योतीराव फुले यांचे जवळचे सहकारी होते. सत्यशोधक चळवळीचे मुखपत्र दीनबंधुचे मुख्य संपादक व प्रसारक होते. त्याचबरोबर समाजसुधारक सुध्दा होते. इ.स.१८४८ मध्ये पुणे जिल्यातील खेड तालुक्यात कन्हेरसर येथे त्यांचा जन्म झाला. ते जातीने फुलमाळी होते. भाजीपाला, फळे व फुले विकून पोट भरण्यासाठी त्यांचे वडील ठाण्यात स्थायिक झाले. त्यांचे दहावीपर्यतचे शिक्षण तेथेच झाले. फाजलभाई नानशी या खोजा व्यापाऱ्यांचा त्यांच्यावर लोभ असल्याने सुरूवातीला रेल्वेत व नंतर टपालखात्यात नोकरी करून उदरनिर्वाह केला.त्यानंतर फाजलभाईच्या शिफारशीवरून मांडवी मिलमध्ये स्टोअर किपर म्हणून काम करू लागले. (१८७०) लोखंडे हे उत्तम वक्ते कुशल संघटक होते. कल्पकता व अभ्यासु वृत्ती हे गुण त्यांच्याठिकाणी होते. तसेच ते कट्टर सत्यशोधक असल्यामुळे त्यानी मुंबई व ठाण्यामध्ये जातीभेद निर्मुलन स्त्री–पुरूष समानता या सारख्या गोष्टीचा प्रसार केला ''मराठा ऐक्येच्छू सभा ' ही संस्था स्थापन करून त्या माध्यमातून मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांत विद्येचा प्रसार, वाईट चालीरीती दुर करून त्याच्यात ऐक्य प्रस्थापीत करण्याचे काम केले. सत्यशोधक चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर असल्यामुळे त्यांनी उपेक्षीतांच्या प्रश्नाना वाचा फोडली. गिरणीकामगार म्हणून काम करू लागल्यामुळे कामगारांची स्थिती त्यानी जवळून पाहीली .मुंबईतील परळपासून भायखळयापर्यतचा भाग गिरणगांव म्हणून ओळखला जाई. त्यावेळी कामगांराना सप्ताहीक सुटटी नव्हती कामाचे तास निश्चित नव्हते, पगार व पगारांची तारिख निश्चित नव्हती बालकामागार व स्त्रियांना दिली जाणारी मजुरी कमी होती. कोदंट वातावरणात त्यांना काम करावे लागे एकूण गिरणी कामगारांची परिस्थिती दयनिय होती. हया पार्श्वभुमीवर त्यानी कामगार वर्गात जागृती करून त्याना संघटीत केले व मुंबईतील गिरणी कामगारांची संघटना बाधण्याचे ठरविले.त्याच्या प्रयत्नामधुन 'बॉम्बे मिल हॅंड असोसिएशन ही देशातील पहिली कामगार संघटना इ.स.१८८४ मध्ये स्थापन झाली.

**मुंबईतील कापड उद्योगाची भरभराट**

ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकाळत मुंबई बेटाची आद्योगिक भरभराट होण्याला सुरूवात झाली. समुद्रावरील डाकुचा इंग्रजानी बदोबस्त केल्यामुळे व्यापाऱ्याची मनातील भिती नष्ट होवून त्यानी बिनधास्तपने व्यापाराला सुरूवात केली. आधीच चीनशी चालु असलेल्या कापसाच्या व चंदनाचे किफायतशीर व्यापाराबरोबर मुंबईतून अफुची सुध्दा निर्यात होवू लागली. त्यामधुन इंग्रज व पारशी व्यापारी लाखो रूपयाचा नफा कमवू लागले. आद्योगिक क्रांतीमुळे इंग्लडने रंगरूप पालटले होते. यंत्राच्या साहयाने उत्पादन अनेक



Smt. Sindhutai Jadhav Maha... Mehkar 330

पटीने वाढले होते. लँकेशायरमधील कापडगिरण्या भारतातील गुजरात, वऱ्हाड, खानेदश या भागात पिकणारा कापूस खरेदी करू लागल्या व त्यापासून तयार होणारे कापड मुंबईत आणुन विकू लागले मांजरपाट नावाने ओळखले जाणारे मँचेस्टरचे कापड निरक्षर माणसाच्या सुध्दा ओळखीचे झाले.

महाराष्ट्रातील आद्योगिकरणाचा विशेषत: कापड उद्योगाचा पाया एकोणिसाव्या शतकाच्या उतरार्धात घातला गेला. मुंबईतील प्रसिध्द व्यापारी कावसजी दावर यानी ११ जुलै १८५१ रोजी पहिल्या कापड गिरीणीला प्रारंभ केला. त्यापाठोपाठ माणेकजी पेटिट यानी १० ऑगस्ट १८५४ रोजी दुसरी कापड गिरणी सुरू केली. इ.स.१८६०पर्यंत मंगळदास नथुभाई, दिनशॉ पेटिट,बोमनजी वाडिया व केशवजी नाईक यानीही आपपल्या मालकीच्या कापडगिरण्या काढल्या. इ.स. १८७२—७३ पर्यंत मुंबईतील कापड गिरण्याची संख्या १८ पर्यंत जावून पोहचली दिवसेदिवस कापड गिरण्यांची संख्या वाढत जावून १८९० पर्यंत एकून १३७ झाली. त्यापैकी फक्त ४३ कापड गिरण्या मुंबई इलाख्याचे बाहेर होत्या. उर्वरीत ९४ मुंबई व मुंबई इलाख्यातच होत्या यावरून कापड उद्योगाच्या भरभराटीची कल्पना येंते.

**गिरणी कामगारांच्या समस्या**

भारतीय उद्योगधंदयाचा ऱ्हास झाल्यानंतर बेकार कारागीर शेतीकडे वळले ज्यांना शेंती नव्हती ते मजुर म्हणून शहरात आले. कारखाने व गिरण्यामध्ये अल्प वेतनावर राबु लागले मुंबईतील गिरणी मालक अमराठी व कामगार मराठी भाषिक होते.त्यामुळे कापड गिरणीतील कामगारासमोर अनेक समस्या होत्या. कामगारांना आठवडयाची सुटटी नव्हती, त्याना दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यत तेरा चौदा तास काम करावे लागत असे. कामाची वेळ ठरलेली नसे पगाराची तारिख निश्चित नव्हती दोन महिण्यातून कधीतरी एकदा पगार होत असे. सात आठ वर्षाच्या बालकांना गिरण्यात काम करावे लागत असे त्याना व स्त्रीयांना दिली जाणारी मजुरी ही फार कमी होती. लहान लहान कारणावरून दंड आकारून पगार कपात केला जाई. परवानगी न घेता गैरहजर राहने काम कमी करणे यासाठी दंड आकाराला जाई. महीन्यातून तीन ते चार वेळा मशीन दुरूस्तीच्या नावाखाली कामगांराना कारखान्यात हजर राहवे लागते असे परंतु त्या दिवसाची मजुरी मिळत नव्हती. गिरण्यातील हवा कोंदट असे धुळ व उष्णाताही भरपूर असे, शौचालयाची व्यवस्था नव्हती त्यामुळे कामगांराचे आरोय धोक्यात आले. तसेच कामगारवर्गाची भरती ठेकेदामार्फत होत असे. त्यामुळे ठेकेदार अत्यंत कमी मजुरीवर गिरणीमालकाला मजुर मिळवून देत असे त्या मोबदल्यात त्याला मालकाकडून दस्तुरी किंवा बक्षीस मिळत होते थोडक्यात गिरणी मालकाबरोबर एतदेशीय जॉबर (ठेकेदार) कडून सुध्दा कामगांराचे शोषण होत असे.

स्पर्धायुक्त अर्थव्यवस्थेत भांडवलदार श्रमिकाला त्याच्या श्रमाचा न्याय मोबदला कधीच देत नाही. नाइलाजाने जेवढे वेतन देणे भाग आहे तेवढेच देतो व उर्वरीत श्रम मुल्याचा अपहार करतो. भारतातील गिरणीमालक सुध्दा गिरणी कामगारांना अल्प वेतन देवून शोषण करीत होते.

**पहिले फॅक्टरी कंमीशन (इ.स.१८७५)**

मुंबईतील गिरण्याची स्पर्धा लँकेशायर गिरणी मालकांना जाणवू लागली. असंघटीत कामगारांना अल्प वेतनावर राबवून त्यांच्या कडून भरपूर उत्पादन काढले जाई व स्वस्त किंमतीला विकले जाई. त्या तुलनेंत मँचेस्टरहून आयात केले जाणारे मांजरपाट ही गिऱ्हाईकांना महाग पडत असे. त्यामुळे मुंबईतील गिरणी



330

Scanned by TapScanner

मालकांचा लॅंकेशायर मधील गिरणी मालकांना हेवा वाटू लागला व कामगारांबद्दल कळवळा निर्माण झाला. अशी परिस्थिती राहीली तर आपल्याला नुकसान सहन करावे लागले म्हणून धुर्तपणे सरकारकडे 'मुंबईतील गिरण्याना निर्यात्रत करणारा कायदा करण्याचा आग्रह धरला' इ.स.१८७४ मध्ये मेजर मुर या कापूस खात्याच्या निरिक्षकांने तसेच रेडग्रेव्ह या इंग्लडमधील कारखान्याच्या निरिक्षकांने भारतात सरकारने कारखान्याबाबत कायदा करावा असे सुचविले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून मुंबईतील गिरणी मालकांचे संघटनेने 'आम्ही कामगारांचे हितच पाहतो' असे भासवून त्याला विरोध केला परंतु इग्लडमधील गिरणी मालकांचा दबाव वाढल्यामुळे अखेर मुंबईचे जिल्हाधिकारी अर्बुथनाट ;नतइवजी दिवजद्ध यांचे अध्यक्षतेखाली २३ मार्च १९७५ रोजी पहिले फॅक्टरी कमिशन नियुक्त करण्यात आले. त्यामध्ये अध्यक्ष अर्बुथनाट व रावसाहेब मंडलीक यांचा अपवाद वगळता इतर सर्व सभासद गिरणीमालकाच होते त्यामुळे कारखान्यासंबधी कायदा करण्यास त्याचा विरोध होता. अखेर या आयोगाचे शिफारशीवर आधारलेले एक विधेयक सरकारने तयार केले पण ते मंजुर करण्याची तसदी घेतली नाही.

### इ.स. १८८१चा फॅक्टरी ॲक्ट

कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या वाढत होती तसे त्यांच्या हलाखीच्या परिस्थितीकडे समाजसुधारकांचे लक्ष केंद्रीत झाले. बंगालमधील समाजसुधारक सोराबजी शापुरजी बेगाली व पुण्याची सार्वजनिक सभा यानी पुढाकार घेवून गिरणीत काम करणाऱ्या लहान मुलाना संरक्षण मिळावे यासाठी मुंबई विधिमंडळात ठराव मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला परवानगी नाकारण्यात आली त्यानंतर त्यांनी इंग्लडमध्ये जावून प्रयत्न केले इग्लंडच्या कॉमन्स सभागृहाने इ.स. १८७९ मध्ये एक विधेयक मंजुर करून मुंबई सरकारकडे पाठविले. गिरणीमालकांच्या संघटनेने त्याला विरोध केला. त्यामध्ये काही उच्चवर्णीयांच्या वृत्तपत्राचा सुध्दा समावेश होता. अखेर हिंदुस्थानचे सरकारने सौम्य व मर्यादीत स्वरूपाचे एक विधेयके मंजुर केले त्याला १८८१ चा फॅक्टरी असे म्हणतात. त्यामध्ये पुढील तरतुदीचा समावेश होता. १) ७ वर्षा पेक्षा कमी वयाच्या मुलांना कामावर घेवू नये २) १२ वर्ष वयाचे बालकांस ९ तासापेक्षा जास्त वेळ काम देवू नये ३) धोकादायक यंत्राभवती तारेचे कुंपन घालावे ४) कारखान्याच्या निरिक्षणासाठी निरिक्षकांची नियुक्ती करावी ५) सदर कायदा १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या गिरणीसाठीच लागू करावा.एकुण प्रस्तुत कायदा अतिशय मर्यादित व सौम्य स्वरूपाचा होता.

### नारायण लोखंडे या कामगार नेतृत्वाचा उदय

ब्रिटनच्या लॅंकेशायर परगण्यातील गिरणीमालकांनी मुंबईतील गिरण्यानां नियंत्रित करणारा कायदा करण्याचा आग्रह धरल्यामुळे इ.स.१८८१ चा फॅक्टरी ॲक्ट मंजुर झाला. परंतु त्यामध्ये कामगारवर्गाचा प्रतिनिधी नसल्यामुळे प्रस्तुत कायदा सौम्य व मर्यादित स्वरूपाचा होता. त्यामुळे इ.स. १८८४ मध्ये मुंबई सरकारने कलेक्टर मुलक यांचे अध्यक्षतेखाली दुसरे फॅक्ट्री कमिशन नियुक्त केले.

### परळच्या सुपारी बागेतील ऐतिहासिक सभा

कामगार वर्गाची कैफियत मुलक आयोगाने लक्षात घ्यावी म्हणून कामगार नेते नारायण लोखंडे यानी २३ व २६ सप्टेबर १८८४ रोजी परळ व भायखळा येथे गिरणी कामगाराची जाहीर सभा आयोजित केली. परळच्या सुपारी बागेतील सभेला सुमारे ४००० हजार कामगार उपस्थित होते. कामगारांना संघटीत करण्याचा


330 Jadhav Maha...

हा पहिला प्रयत्न यशस्वी झाला. गिरणी कामगार संघटनेचे अध्यक्ष या नात्याने नारायणराव लोखंडे यांनी मुलक आयोगाला साडेपाच हजार कामगारांच्या सहयानिशी एक अर्ज सादर केला त्यानुसार, दर रविवारी सुटटी दयावी, रोज अर्धातास दुपारी सुटटी असावी, अपघाताबददल नुकसान भरपाई मिळावी, पंधरा तारखेच्या आत वेतन मिळावे आणि सकाळी साडेसहा पासून सुर्यास्ता पर्यंतच काम करून घ्यावे. अशा स्वरूपाच्या मागण्याचे प्रस्ताव मुलक आयोगासमोर सादर करण्यात आले.

**मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावरील भव्य सभा**

इ.स. १८९० मध्ये कापडगिरण्यांमध्ये कापडाचे शिलकी साठे वाढल्यामुळे दरमहा आठ दिवस मुंबईच्या कापड गिरण्या बंद ठेवण्याचा निर्णय गिरणी मालक संघटनेने घेतला. त्यावेळी नारायण लोखंडे यांनी मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावर २४ एप्रिल १८९० रोजी दहा हजार गिरणी कामगारांची सभा आयोजित केली या सभेत स्त्रियांची उपस्थिती मोठया प्रमाणावर होती. या सभेत स्त्रियांची सुध्दा भाषणे झाली. येथे अनेक मागण्या एक मताने करून रविवारची सुटटी मंजुर करून घेण्यात आली.रविवार हा खंडोबाचा दिवस असल्यामुळे शुभ दिवस मानण्यात येतो.

**इ.स. १८९२ फॅक्टरी अॅक्ट**

इ.स.१८९० मध्ये बर्लिन येथे आंतरराष्ट्रीय कामगारांची परिषद भरली या परिषदेला, जगभरातील कामगारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये स्त्री व बाल कामगारांच्या प्रश्नावर सखोल चर्चा झाली अनेक ठराव मंजुर झाले. त्यामुळे मँचेस्टरच्या 'चेंबर ऑफ कॉमर्स' ने कापड उद्योगातील कामगारांच्या बाबतीत सुधारणा करण्याची मागणी केली. त्यादृष्टीने हिंदुस्थान सरकारवर दबाव आणला त्यामुळे मुंबईच्या गव्हर्नरने पुर्वीचा मुलक आयोगाचा अहवाल बाजुला ठेवून २५ जानेवारी १८९० रोजी लेबर आयोगाची नियुक्ती केली. त्यामध्ये कामगार वर्गाचे प्रतिनिधी म्हणून नारायण लोखंडे यांचा समावेश होता. या आयोगाने कामगार संघटना, गिरणी मालक संघटना, यांच्याशी चर्चा करून एक अहवाल तयार केला. त्या अहवालाला सरकारने लगेच मंजुरी देउन १ जानेवारी १८९२ रोजी त्याचे कायदयात रूपांतर केले. त्याला १८९२ चा फॅक्टरी अॅक्ट असे म्हणतात. त्यामध्ये पुढील तरतुदींचा समावेश होता.

- दर सातव्या वर्षी कारखान्याला रंग दयावा.
- कारखान्यात पंखे असावेत.
- ९ वर्षाखालील मुलांना कामावर घेउ नये.
- ज्या गिरणीमध्ये व कारखान्यात मुले व स्त्रिया मिळून दहापेक्षा जास्त कामगार आहे त्यांना हा कायदा लागू करावा.
- सदर कायदा सर्वांना माहिती व्हावा म्हणून मराठीतून ठळकपणे छापून दर्शनी भागावर लावावा.
- स्त्री कामगारांना सकाळी ६ पुर्वी कामावर बोलवु नये आणि संध्याकाळी ६ नंतर थांबवू नये.
- स्त्री कामगारांना दुपारी अर्धातास जेवणाची सुटटी दयावी.
- स्त्रीयांना ११ तासापेक्षा जास्त काम देउ नये.



330

- सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा व हवेशीरपणा या बाबत नियम तयार करण्याचे अधिकार स्थानिक सरकारला देण्यात आले.

बालकामगारांच्या वयाची मर्यादा, त्यांना शिक्षणाची संधी, स्त्रियांच्या वेळेची मर्यादा या कायदयातील भरीव स्वरूपाच्या तरतुदी होत्या कायदयाच्या निर्मिती बरोबरच अंमलबजावणीसाठी नारायण लोखंडे यांनी सातत्याने प्रयत्न केले. आशा स्वरूपाचे प्रयत्न यापुर्वी झाले नव्हते त्यामुळे नारायण मेघाजी लोखंडे कामगार चळवळीचे जनक ठरतात. त्यांच्या प्रयत्नामुळे मुंबईच्या गिरणी कामगाराच्या परिस्थीतीत अमुलाग्र बदल होण्याला प्रारंभ झाला.

**सारांश**

आद्यौगीक क्रांतीच्या प्रारंभकाळात ज्याप्रमाणे इंग्लडमधील असंघटीत कामगार जनावराचे जिणे जगत होते. त्याप्रमाणे मुंबईतील गिरणी कामगारांची परिस्थिती होती. परंतु नारायण लोखंडे यांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी गिरणी कामगारांची संघटना स्थापन केली. मुंबईतील परळच्या सुपारी बागेत व महालक्ष्मी रेसकोर्स मैदानावर हजारो कामगारांना एकत्रीत आणून त्यांच्या न्याय मागण्या मान्य करण्यासाठी सरकारवर दबाव आनला. त्यामुळे कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकाने नियुक्त केलेल्या लेबर आयोगामध्ये कामगार वर्गाचे प्रतिनिधी म्हणून नारायण लोखंडे यांचा समावेश झाला. त्यांनी आयोगासमोर कामगारांची कैफियत मांडुन त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. परिणामी १८९२ चा फॅक्टी अॅक्ट मंजुर होवून त्यानुसार गिरणी कामगारांना न्याय मिळाला. त्यामध्ये नारायण लोखंडे यांचे योगदान मोलाचे आहे. लोखंडे यांच्या कामगार संघटनेची प्रेरणा सत्यशोधक चळवळीची होती. माणूस सर्व पातळीवर शोषण मुक्त व्हावा हे या चळवळीचे मुख्य ध्येय होते. त्याला पुढे ठेवून लोखंडे यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने सुध्दा या कामगार नेत्याच्या सनदशीर चळवळीची व इतर क्षेत्रातील कार्याची दखल घेवून त्यांना 'रावबहादुर' ही पदवी देवून सन्मानीत केले. अखेर १ फेब्रुवारी १८९७ रोजी हया सत्यशोधकी कामगार नेत्याचा मृत्यू झाला.

**संदर्भग्रंथ**

१. फडके य.दी, विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १, के सागर पब्लीकेशन , पुणे.
२. कठारे डॉ. अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, ( १८१८–१९६०) विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद.
३. प्रा.दिनेश मोरे, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,(१८१८–१९६०),कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद.
४. प्राचार्य डॉ. एस.एस.गाठाळ, महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद.
५. देवगांवकर एस.जी, सामाजिक चळवळी परंपरागत व नविन ,साईनाथ प्रकाशन नागपूर.
६. वैदय सुमन, कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास , ( १८५०–१९२०), ,साईनाथ प्रकाशन नागपूर.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana